**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

### सांस्कृतिक विभाग – भीमाशंकर करंडक विजयी

**पुण्य नगरी**

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने भीमाशंकर करंड पटकावला

**। राजगुरूनगर : प्रतिनिधी**

डी. जी. फाउंडेशन आयोजित आंतरमहाविद्यालयीन भीमाशंकर करंडक स्पर्धा नुकतीच मंचर येथे संपन्न झाली. या स्पर्धेच्या विजेतेपदाचा करंडक खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने पटकाविला. राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, सिने अभिनेता आकाश ठोसर, पूर्वा वळसे पाटील यांच्या हस्ते आकर्षक करंडक आणि रोख ५१ हजारांचे बक्षीस देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला.



भीमाशंकर करंडकांतर्गत एकांकिका स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयातील प्रवास महत्त्वाचा आहे- सुखाचा शोध या एकांकिकेचा प्रथम क्रमांक आला. उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट अभिनेता अवधूत धायबर तर उत्कृष्ट नेपथ्यकार म्हणून हर्षल गेडाम यांना गौरविण्यात आले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक आदित्य हानवटे, गीतगायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक कृतिका वाळुंज आणि वैयक्तिक नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्रचिती नेटके यांनी पटकाविला. भीमाशंकर करंडक स्पर्धा जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या प्रचिती नेटके, सूरज पावडे, श्वेता धवसे, हर्षल गेडाम, अवधुत धायबर या विद्यार्थ्यांसह बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांचे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा. अर्चना खांडेभराड यांचे विशेष कौतुक संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राज्याला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी केले. भीमाशंकर करंडक मिळवून देणाऱ्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संस्था व महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घालण्याचे काम केल्याबद्दल सर्व विद्यार्थी कौतुकास पात्र असल्याचे म्हणाले.

Pimpri Chinchwad Edition
Feb 06, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

लोकमत



# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाकडे भीमाशंकर करंडकाचे विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** डी. जी. फाउंडेशन आयोजित आंतरमहाविद्यालयीन भीमाशंकर करंडक स्पर्धा नुकतीच मंचर येथे झाली. या स्पर्धेच्या विजेतेपदाचा करंडक खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने पटकाविला. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, सिनेअभिनेता आकाश ठोसर, पूर्वा वळसे पाटील यांच्या हस्ते आकर्षक करंडक आणि रोख ५१ हजारांचे बक्षीस देऊन महाविद्यालयाचा गौरव केला.

भीमाशंकर करंडकांतर्गत एकांकिका स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयातील प्रवास महत्त्वाचा आहे - सुखाचा शोध या एकांकिकेचा प्रथम क्रमांक आला. उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट अभिनेता अवधूत धायबर, तर उत्कृष्ट नेपथ्यकार म्हणून हर्षल गेडाम यांना गौरविण्यात आले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक आदित्य हानवटे, गीतगायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक कृतिका वाळुंज आणि वैयक्तिक नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्रचिती नेटके यांनी पटकाविला. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, हरिभाऊ सांडभोर प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर आदी विजेत्यांचे अभिनंदन केले.

Hello Pune Gramin
Page No. 2 Feb 07, 2025
Powered by: erelego.com

# हुतात्मा राजगुरू कॉलेजला मानाचा भीमाशंकर करंडक

मंचर, ता. ७ : उत्तर पुणे जिल्ह्यात युवक-युवतींच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी मंचर-मणिपूर (ता. आंबेगाव) येथील नालंदा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शनिवारी (ता. १) भीमाशंकर करंडक भरविण्यात आला होता. या करंडकच्या महाअंतिम फेरीत हुतात्मा राजगुरू आर्ट, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज राजगुरुनगर हे विजेते ठरले असून त्यांना मानाचा भीमाशंकर करंडक मिळाला, तर आर्ट, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज नारायणगाव हे उपविजेते ठरले आहे.

आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या संकल्पनेतून साकार होणाऱ्या महोत्सवाचे हे १३ वे वर्षे आहे. डीजी फाउंडेशनने आयोजित केलेल्या अंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सवात खेड, आंबेगाव, जुन्नर व शिरूर तालुक्यातील ५० महाविद्यालयांनी भाग घेतला होता. यामध्ये एकांकिका, एकपात्री अभिनय, गीत गायन, वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य व वक्तृत्व आदी स्पर्धा झाल्या. महाअंतिम फेरीत दाखल झालेल्या निवडक १६ महाविद्यालयांचे कलाविष्कार प्रेक्षकांना पहावयास मिळाले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. दिलीप वळसे पाटील, शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा, पूर्वा वळसे पाटील, किरण वळसे पाटील, अॅड. राहुल पडवळ यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली.



**मणिपूर-मंचर (ता. आंबेगाव) :** मानाचा भीमाशंकर करंडक स्वीकारताना हुतात्मा राजगुरू आर्ट, कॉमर्स, सायन्स कॉलेजचे विद्यार्थी.

## स्पर्धा निहाय प्रथम क्रमांकाचे विजेते :

**वक्तृत्व** : श्रद्धा अहिनवे (अण्णासाहेब वाघेरे कॉलेज ओतूर),

एकपात्री अभिनय : ऐश्वर्या अडसरे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अवसरी खुर्द),

**गीत गायन :** सागर दाते (पी. के. टेक्निकल कॅम्पस चाकण),

वैयक्तिक नृत्य : आदित्य हानवटे (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर),

**समूह नृत्य** : समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट बेल्हे,

**उत्कृष्ट नर्तक** : गजानन गुप्ता (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अवसरी खुर्द),

**उत्कृष्ट नृत्यांगना :** कांचन डामसे (अण्णासाहेब आवटे कॉलेज मंचर),

उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक : लॉ कॉलेज राजगुरुनगर,

**एकांकिका नाट्य** : हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर,

**उत्कृष्ट सादरीकरण** : पी. के. टेक्निकल कॅम्पस चाकण,

**उत्कृष्ट दिग्दर्शक** : हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर,

**उत्कृष्ट लेखक :** बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव,

**उत्कृष्ट कथा** : लॉ कॉलेज राजगुरुनगर,

**उत्कृष्ट नेपथ्य :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर,

**उत्कृष्ट अभिनेता एकांकिका** : अवधूत घायवर (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर),

**उत्कृष्ट अभिनेत्री एकांकिका :** अपूर्वा कुलकर्णी (आर्ट कॉमर्स सायन्स कॉलेज नारायणगाव),

**शिस्तप्रिय महाविद्यालय** : शासकीय तंत्रनिकेतन अवसरी खुर्द,

**उत्कृष्ट कला शिक्षक :** प्रा. एस. बी. पाटील (अण्णासाहेब वाघिरे कॉलेज ओतूर),

**उत्कृष्ट विद्यार्थी प्रतिनिधी** : संचिती मंडलिक, भाग्योदय चाबुकस्वार.

दै सकाळ

# भीमाशंकर करंडक विजेतेपद हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाकडे

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** डी. जी. फाऊंडेशन आयोजित आंतरमहाविद्यालयीन भीमाशंकर करंडक स्पर्धा नुकतीच मंचर येथे झाली. या स्पर्धेच्या विजेतेपदाचा करंडक येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने पटकाविला. राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, सिने अभिनेता आकाश ठोसर, पूर्वा वळसे पाटील यांच्या हस्ते आकर्षक करंडक आणि रोख ५१ हजारांचे बक्षीस देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला.



भीमाशंकर करंडकांतर्गत एकांकिका स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयातील प्रवास महत्त्वाचा आहे - सुखाचा शोध या एकांकिकेचा प्रथम क्रमांक आला. उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट अभिनेता अवधूत धायबर तर उत्कृष्ट नेपथ्यकार म्हणून हर्षल गेडाम यांना गौरविण्यात आले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक आदित्य हानवटे, गीतगायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक कृतिका वाळुंज आणि वैयक्तिक नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्रचिती नेटके यांनी पटकाविला. भीमाशंकर करंडक मिळवून देणाऱ्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

दै. केसरी

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख